खाजगी क्षेत्रातील जमीन खासगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी

पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत

## जाहिर नोटीस

विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, पुणे.
नवीन जिल्हाधिकारी इमारत
अ' - विंग १ला मजला, पुणे -४११००१
यांचे कार्यालय

दिनांक : ०१/१०/२०१८

ज्या अर्थी मौ.बारामती ता.बारामती जि.पुणे येथील बारामती नगरपरिषद मंजूरीच्या विकास योजनेमध्ये आ.क्र.८८ 'अपर पोलिस अधिक्षक यांचे कार्यालयाकरिता ' खाजगी जमीन संपादना करण्याबाबत महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई या कडील शासन परिपत्रक क्र. एल क्यू एन ०१/ २०१७ / प्र.क्र.१२ / अ-२, दिनांक २५/१/२०१७ मधील तरतुदीत अनुसरून व शासनाकडील शुध्दीपत्र दिनांक २७/११/२०१७ खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीव्दारे थेट पध्दतीने मा. पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, पुणे यांच्या व्दारे घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी (भूसंपादन शाखा), पुणे यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, मा.जिल्हाधिकारी, पुणे (भूसंपादन शाखा ) यांचे आदेश क्र.पीएलसी / सीआर / ९५ / २०१८ दि. ३०/७/१०१८ अन्वये उक्त प्रस्तावासंबधी उक्त शासननिर्णय दि. १२ मे २०१५, दि. १० सप्टेंबर २०१५ तद्अनुषंगाने /शासननिर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्र. एल क्यु एन / ०१ / २०१७ / प्र.क्र. १२ / अ-२, दि. २५ जानेवारी २०१७ व दि. २७ नोव्हेंबर २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी श्री.दिलीप घेवारे, वि.भू.सं.अ.क्र.१४,पुणे या व्दारे :-

१) अनुसुची मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण, पुणे यांचे नांवे घेण्याबाबत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहे

२) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० यामध्ये शेडयुल्ड १ च्या तरतुदीनुसार संबधीत जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेच्या २५% रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

१) संबधित भूधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीव्दारे पोलीस अधिक्षक ,पुणे ग्रामीण , पुणे यांच्या नावे खरेदीने देण्यास स्वेच्छेने तयार असल्याच्याबाबत संमतीपत्रे विकल्प मागवीत आहे.

Scanned by CamScanner

२) संबधित भूधारकाची ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) सक्षम प्राधिकारी म्हणून वि.भू.सं.अ.क्र. १४,पुणे यांचे कार्यालयाकडे दाखल करावीत.

३)संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना सक्षम प्राधिकारी वि.भू.सं.अ.क्र.१४,पुणे यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत सक्षम अधिकारी वि.भू.सं.अ.क्र.१४, पुणे यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबधित व्यक्तीना तसेच जनतेस निरिक्षणासाठी खुले ठेवण्यात आली आहे.

Sd/-
(दिलीप घेवारे)
वि.भू.सं.अ.क्र.१४ पुणे

'अनुसुची'

खरेदी दयावयाच्या जमिनीचा तपशील

| अ.क्र. | गावाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १) | मौ.बारामती, ता.बारामती, जि.पुणे. | २६९/१/अ | १ हे. ३६ आर. |

Scanned by CamScanner